# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांक:23.03.2024** **वार:शनिवार**

1. भारत-भूतान मैत्रीचा नवा अध्याय, पंतप्रधान मोदी भूतानच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित
2. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना ईडीची कोठडी, निवडणूक आयोगानं हस्तक्षेप करण्याची विरोधकांची मागणी
3. गैरप्रकार आढळून आल्याप्रकरणी 20 सीबीएसई शाळांची संलग्नता रद्द
4. रशियात मॉस्कोजवळील एका सभागृहानजीक बंदूकधाऱ्यानी केलेल्या गोळीबारात 40 हून अधिक ठार, तर शंभराहून अधिक जण जखमी. आणि
5. भारताचा बॅडमिंटनपटू किदम्बी श्रीकांत याचा स्विस खुल्या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश.

**भूतान-भारतसंबंध**

भारत आणि भूतान यांनी राष्ट्रीय हितासंबंधित मुद्द्यांवर एकमेकांशी घनिष्ठ समन्वय आणि सहकार्य सुरू ठेवण्याचं मान्य केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी भूतानच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. काल उभय देशांतर्फे एक संयुक्त निवेदन जारी करण्यात आलं. जलविद्युत, सौर आणि हरित हायड्रोजन या क्षेत्रांत उभय देश आपली स्वच्छ ऊर्जा भागीदारी वाढवत राहतील आणि या प्रदेशात ऊर्जा सुरक्षा वाढविण्यासाठी संयुक्तपणे नवीन प्रकल्प विकसित करतील असं या संयुक्त निवेदनात नमूद करण्यात आलं आहे. दोन्ही देशांनी परिवर्तानात्मक भागीदारीचा पाठपुरावा करण्याचं मान्य केलं आहे. यात, रेल्वे, रस्ते, हवाई, जलमार्ग, त्याचप्रमाणे वस्तू आणि सेवांच्या अव्याहत सीमापार वाहतुकीसाठी पायाभूत सुविधा, आर्थिक तसेच डिजिटल कनेक्टिव्हिटी समाविष्ट आहे. दोन्ही देशांमध्ये असलेले सांस्कृतिक आणि आध्यात्मिक बंध यामुळेच भारत आणि भूतानची मैत्री टिकून असल्याचं या संयुक्त निवेदनात म्हंटल आहे. तत्पूर्वी, भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक यांनी काल थिंपू इथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना, भूतानचा सर्वोच्च नागरी पुरस्कार 'ऑर्डर ऑफ द ड्रुक ग्याल्पो' प्रदान केला. आपल्या आयुष्यातील हा सर्वात मोठा दिवस आहे. प्रत्येक पुरस्कार हा खास असतो, परंतु जेव्हा तो दुसऱ्या देशाकडून प्राप्त होतो, तेव्हा, दोन्ही देश योग्य संबंधांच्या दिशेने वाटचाल करत आहेत असा त्याचा अर्थ होतो. हा सन्मान माझा वैयक्तिक नसून, 140 कोटी भारतीयांचा हा सन्मान आहे, आणि आपण तो अतिशय नम्रपणे स्वीकारत आहोत, असं पंतप्रधान मोदी सत्काराला उत्तर देताना म्हणाले. हा पुरस्कार प्राप्त करणारे नरेंद्र मोदी पहिलेच विदेशी नेते आहेत.

**पंतप्रधान भूतान**

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भूतान दौऱ्याचा आजचा शेवटचा दिवस आहे. पंतप्रधानांच्या हस्ते ग्याल्टसुएन जेटसन पेमा माता आणि बालक या अत्याधुनिक रुग्णालयाचं उद्घाटन करण्यात आलं. भारत सरकारच्या सहकार्यातून थिम्पू इथं हे रुग्णालय उभारण्यात आलं आहे. काही वेळापुर्वी झालेल्या या कार्यक्रमाला पंतप्रधान शेरिंग तोबगे उपस्थित होते.

**केजरीवाल अटक-विरोधीपक्ष**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अटकेनंतर विरोधकांनी निवडणूक आयोगाकडे हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. सर्वपक्षीय विरोधी शिष्टमंडळाने काल निवडणूक आयोगाच्या सदस्यीय मंडळाची भेट घेतली. केंद्र सरकार, विविध सरकारी यंत्रणांचा विरोधी पक्षांविरुद्ध कथित गैरवापर करत असल्याचे पुरावे आपण आयोगाला सादर केले असल्याचं या शिष्टमंडळाने सांगितलं. काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, डावे, समाजवादी पक्ष आदी पक्षांचे नेते या शिष्टमंडळात सहभागी झाले होते.

**<u>केजरीवाल</u>**

दिल्लीतील विशेष न्यायालयानं काल दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना 'मद्यावरील उत्पादन शुल्क कर धोरण' घोटाळा प्रकरणी 28 मार्चपर्यंत सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीच्या कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. केजरीवाल यांना केंद्रीय तपास यंत्रणेने गुरुवारी रात्री अटक केली होती, त्यानंतर काल त्यांना केंद्रीय अन्वेषण अर्थात विशेष सीबीआय न्यायालयात हजर करण्यात आलं. विशेष सीबीआय न्यायाधीश कावेरी बावेजा यांनी त्यांना कोठडी बजावली. आता मागे घेण्यात आलेल्या मद्यावरील उत्पादनशुल्क धोरण ठरवण्यात केजरीवाल यांचा थेट सहभाग होता असा युक्तिवाद, संचालनालयाने केजरीवाल यांच्या कोठडीची मागणी करताना केला होता. दरम्यान, मी तुरुंगात असलो तरी, तिथूनही देशासाठी काम करत राहीन असं केजरीवाल यांनी एका माध्यमप्रतिनिधीला सांगितलं. अटकेनंतरही अरविंद केजारीवालच दिल्लीचे मुख्यमंत्री म्हणून कायम राहतील असं आम आदमी पक्षातर्फे जाहीर करण्यात आलं आहे. ईडी सारखी केंद्रीय यंत्रणा, केंद्रातील सत्ताधाऱ्यांच्या हातातील बाहुलं बनलं असल्याचा आरोपही आपनं केला आहे.

**<u>CBSE-शाळा संलग्नता</u>**

गैरप्रकार आढळून आल्याच्या कारणावरून, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात CBSE ने 20 शाळांची, मंडळाशी असलेली संलग्नता काढून घेतली आहे. यामध्ये एकट्या दिल्लीतील पाच शाळा आहेत. मंडळानं अचानक केलेल्या तपासणी दरम्यान या शाळांमध्ये, संलग्नता आणि परीक्षा नियमांचं पालन यात विसंगती आढळून आली; त्यानंतर ही कारवाई करण्यात आल्याचं मंडळाने जारी केलेल्या पत्रकात म्हंटलं आहे. या शाळा, पटावर खोटे विद्यार्थी दाखवणे, अनियमित नोंदी असे गैरप्रकार करत असल्याचं आढळून आलं आहे.

**<u>मॉस्को-हत्याकांड</u>**

रशियाची राजधानी मॉस्कोजवळील एका सभागृहानजीक बंदूकधाऱ्यानी केलेल्या गोळीबारात 40 जण ठार झाले, तर शंभराहून अधिक जण जखमी झालेआहेत. रशियाची सरकारी माध्यम संस्था टीएएसएसनं दिलेल्या माहितीनुसार, तीन सशस्त्र हल्लेखोरांनी मॉस्को शहराच्या बाहेर असलेल्या क्रोकस सिटी हॉल मध्ये शिरून अंदाधुंद गोळीबार केला. त्यानंतर सभागृहाच्या छताला आग लागली. घटनास्थळावर विशेष सुरक्षा दलाच्या तुकड्या आणि अग्निशमन दलाच्या तुकड्या त्वरित दाखल झाल्या आणि त्यांनी अनेक नागरिकांना सुरक्षित बाहेर काढलं. दरम्यान, या हल्ल्यात आपला हात नसल्याचं युक्रेननं स्पष्ट केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मॉस्कोमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला आहे. समाजमाध्यमावरून दिलेल्या संदेशात, मोदी यांनी पीडीतांच्या कुटुंबियांबाबत संवेदनशील असल्याचं सांगून रशियन फेडरेशनसोबत एकजुटीने उभा असल्याचं म्हटलं आहे.

**<u>अमेरिकी प्रस्ताव-व्हेटो</u>**

संयुक्त राष्ट्र संघांच्या सुरक्षा परिषदेत, गाझा पट्टीत युद्धविराम करण्याच्या अमेरिकेच्या प्रस्तावाला, रशिया आणि चीननं व्हेटो अर्थात नकार दिला. पॅलेस्टीनी नागरिकांचं संरक्षण आणि त्यांना मानवतावादी दृष्टीकोनातून मदत पोहोचवण्यासाठी गाझामध्ये युद्धविराम घोषित करावा, असा प्रस्ताव अमेरिकेनं मांडला होता. अमेरिकेच्या या भूमिकेवर रशियानं टीका केली. इस्रायलवर दबाव आणण्यासाठी अमेरिका करत असलेले प्रयत्न दांभिक आणि कुचकामी असल्याचं रशियाने म्हंटल आहे. 15 सदस्यीय सुरक्षा परिषदेत 11 सदस्यांनी प्रस्तावाच्या बाजूने तर, तीन सदस्यांनी विरोधात मतदान केलं. एक सदस्य गैरहजर होता. रशिया आणि चीनने प्रस्ताव फेटाळल्यावरून, अमेरिकेच्या राजदूत लिंडा थॉमस-ग्रीनफिल्ड यांनी रशिया आणि चीनचा निषेध केला आहे.

**<u>शहीददिन</u>**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात आपल्या प्राणाची आहुती देणाऱ्या भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना आदरांजली देण्यासाठी आजचा दिवस शहीद दिवस म्हणून देशभरात साजरा होतो. 1931 साली या तिघांना ब्रिटिशांनी याच दिवशी फाशी

दिली. तिघा शहिदांना अभिवादन करण्यासाठी भगतसिंग यांच्या मूळ गावी खटकरकलन तसंच राष्ट्रीय शहीद स्मारक इथं विशेष सोहोळ्याचं आयोजन केलं जातं.

**<u>भाजप निवडणूक समिती</u>**

लोकसभेच्या निवडणुकांसाठी उमेदवार निश्चितीसाठी भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक आज दिल्लीतल्या पक्ष मुख्यालयात होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, गृहमंत्री अमित शहा या बैठकीला उपस्थित राहाणार आहेत.

**<u>एअर इंडिया दंड</u>**

डीजीसीए अर्थात नागरी विमान वाहतूक महासंचालनालयानं एअर इंडियाला 80 लाख रुपयांचा आर्थिक दंड ठोठावला आहे. विमान उड्डाणाच्या वेळेची मर्यादा आणि विमान कर्मचाऱ्यांच्या विश्रांती व्यवस्थापन नियमांचा भंग केल्याप्रकरणी डीजीसीए नं एअर इंडियाला हा दंड ठोठावला आहे. या संदर्भात, डीजीसीएने या वर्षाच्या सुरुवातीला एअरइंडियाची अचानक तपासणी केली होती; त्यावेळी एअर इंडियाकडून या नियमांचा भंग झाल्याचं आढळून आलं होतं. एअर इंडियानं साठ वर्षापेक्षा अधिक वयाच्या वैमानिक आणि उड्डाण कर्मचाऱ्यांना घेऊन उड्डाण केल्याचं समोर आलं. वैमानिकांना पुरेशी साप्ताहिक विश्रांती न मिळणं, लांब पल्ल्याच्या उड्डाणांआधी आणि नंतर पुरेशी विश्रांती नसणे, अतिलांब पल्ल्याच्या विमान उड्डाण आणि विमान कर्मचाऱ्यांना पुरेशी विश्रांती न दिल्याचं तपासणीत आढळून आलं.

**<u>बॅडमिंटन</u>**

भारताचा बॅडमिंटनपटू किदम्बी श्रीकांत यानं चमकदार कामगिरी करत स्विस खुल्या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. स्वित्झर्लंडमधील बसेल इथं काल झालेल्या उपांत्यफेरीच्या सामन्यात त्यानं ली चिया हाओ याचा 21-10, 21-14, असा धुव्वा उडवला. श्रीकांतनं हा सामना पस्तीस मिनिटातच जिंकला. आज अंतिम फेरीत पोचण्यासाठी श्रीकांतचा सामना लिन चुन यी याच्यासोबत होणार आहे. उपांत्यफेरीच्या दुसऱ्या सामन्यात प्रियांशू राजावत आणि किरण जॉर्ज यांना पराभव पत्करावा लागला.

**<u>हॉकी</u>**

पिंपरीतल्या मेजर ध्यानचंद मैदानावर सुरू असलेल्या 14 व्या हॉकी इंडिया वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत यजमान महाराष्ट्र संघ आणि हरियाणाच्या संघानं अंतिम फेरीत धडक मारली आहे. या दोन्ही संघांमध्ये आता अजिंक्यपदासाठी लढत होणार आहे. काल झालेल्या अत्यंत चुरशीच्या उपांत्य सामन्यात महाराष्ट्र संघाने गतविजेत्या मध्य प्रदेश संघाला 2-1 अशी धूळ चारत अंतिम फेरीत धडक मारली. महाराष्ट्राच्या काजल आटपाडकर आणि आकांक्षा सिंह या विजयाच्या शिल्पकार ठरल्या. तत्पूर्वी पहिल्या उपांत्य सामन्यात हरियाणा संघाने झारखंड संघाचा 4-0 असा एकतर्फी पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.